# <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

<u>दिनांक 06.03.2018 रोजी दुपारी 12.00 वाजता</u> नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| खान फारुख अली इलीयात खान | स. शेर अली अ. महेबुब अली |
| देशमुख सतिश पुंडलीकराव | येवनकर मोहीनी विजय |
| अ. लतीफ अ. मजीद | रावत भानुसिंह गयादनसिंह |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | गोडबोले ज्योत्सना राजु |
| वैशाली मिलींद देशमुख | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे सदस्य व आयुक्त श्री गणेश देशमुख, श्री रत्नाकर वाघमारे, मुख्यलेखाधिकारी श्री संतोष कंदेवाड, मुख्य लेखा परिक्षक श्री आर. एस. कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्रं 01**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 **चे** कलम 95 च्या अधिन राहून मा. आयुक्त, नावाशमनपा नांदेड यांनी सादर केलेले नांवाशमनपाकेचे सालसन 2017-18 चे सुधारीत व सालसन 2018-19 चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देवून ते मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करणे बाबत.

**आयुक्त** सभागृहासमोर सालसन 2017-18 चे सुधारीत व 2018-19 चे अंदाजपत्रक सादर केले आहे. अंदाजपत्रकाचे वाचन केले आहे.

**आनंद चव्हाण** या वर्षीच्या अंदापत्रकाचा अभ्यास करावा लागणार आहे. आजच मा. आयुक्तांनी बजेट सादर केले आहे. परंतू हे बजेटमध्ये काय तरतुदी आहेत त्याचा अभ्यास करण्याकरीता आठ दिवसाचा वेळ देण्यात यावा.

**स. शेर अली** मा. आयुक्त महोदयांनी अंदाजपत्रक सादर करतांना वार्ड विकास निधीचा उल्लेख केलेला नाही.

**आनंद चव्हाण** वार्ड विकास निधीचा समावेश करुन बजेट पास करता येईल.

**अब्दुल सत्तार** वार्ड विकास निधी टाकण्यात यावा. दर वर्षीच्या बजेट मध्ये या निधीचा समावेश असतो.

**आयुक्त** वार्ड विकास निधीबाबतचा निर्णय आपण घेवून बजेट पास करण्यात यावे.

**मसुद अहेमद खान** माझा प्रभागात दलीत वस्ती नाही त्यामुळे माझ्या प्रभागात कामे होणार नाहीत यासाठी माझ्या प्रभागासाठी विशेष निधी देण्यात यावा.

**अब्दुल सत्तार** अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावा.

**सभापती** अंदाजपत्रक अंतीम करण्यापुर्वी स्थायी समीतीचे सदस्य आहेत त्या सदस्यांच्या प्रभागाकडे विशेष लक्ष देण्यात यावे. त्यांच्या प्रभागात कसे जास्त कामे घेता येतील अशा पध्दतीने पहावे. अभ्यास करण्यासाठी सदस्यांना वेळ देण्यात येते.

**सभापती** आजची अंदाजपत्रकिय विशेष सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे. सदरील सभेची तारीख नंतर लेखी सर्व स. सदस्यांना कळविण्यात येईल

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **सभापती** |
| नावाशमनपा नांदेड | स्थायी समिती |
| | नावाशमनपा नांदेड |